# बृहन्मुंबई महानगरपालिका

## सामान्य प्रशासन विभाग

### परिपत्रक

क्र.एमपीआर/3103 दि. 08.08.2023

विषय : बृहन्मुंबई महानगरपालिकेतील 'कार्यकारी सहायक' (पूर्वीचे पदनाम 'लिपिक') संवर्गातील रिक्त पदे निम्नसंवर्गातील कर्मचा-यांमधून खात्यांतर्गत निवड पध्दतीने भरण्यासाठी दि. 12.08.2023 रोजी ऑनलाईन परिक्षा आयोजित करण्याबाबत.

संदर्भ : परिपत्रक क्र. एमपीआर/2384 दि. 24.05.2023

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील कार्यकारी सहायक(पूर्वीचे पदनाम : लिपिक) संवर्गातील रिक्त पदे निम्नसंवर्गातील कर्मचा-यामधून खात्यांतर्गत निवड पध्दतीने भरण्याकरीता परिपत्रक क्र. एमपीआर/2384 दि. 24.05.2023 अन्वये अर्ज मागविण्यात आले होते.

त्यानुषंगाने कार्यकारी सहायक(पूर्वीचे पदनाम : लिपिक) या पदाची खात्यांतर्गत ऑनलाईन परिक्षा शनिवार दि. 12.08.2023 रोजी आयोजित करण्यात आली आहे.

प्रस्तुत परिक्षेसाठी उपस्थित राहण्यासाठी आवश्यक असलेले प्रवेशपत्र डाऊनलोड करण्यासाठी **https://portal.mcgm.gov.in/For Prospects/Careers-All/CHIEF PERSONNEL OFFICER/MPR-3103 dt.08.08.2023** या संकेतस्थळावर पुढील लिंक उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

http://ibpsonline.ibps.in/bmceaapr23/oecla_jul23/login.php?appid=6c0fc1e1cb8346f97765e3558433dfc6

उपरोक्त लिंक वरुन उमेदवारांनी प्रवेशपत्र डाऊनलोड करुन घेऊन त्यासोबतच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याची जबाबदारी संबंधित उमेद्वारांची राहील.

परिक्षेच्या दिवशी परीक्षार्थीना कर्तव्यार्थ समजण्यात येईल. तथापि परिक्षेच्या दिवशी कार्यालयास सुट्टी असल्यास परीक्षार्थींना त्या दिवसाची बदली रजा किंवा कोणताही मोबदला दिला जाणार नाही.

आस्थापना विभागांना सूचित करण्यात येते की, सदर परिपत्रकाची नोंद सर्व उमेदवारांकडून करुन घेण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| सही/-01.08.2023 | सही/-01.08.2023 | सही/-07.08.2023 |
| प्रमुख कर्मचारी अधिकारी | सह आयुक्त(सा.प्र.) | अति.महानगरपालिका आयुक्त(शहर) |

सदर परिपत्रक बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ftp://hr.mcgm.gov.in/circular/GAD/ChPo/MPR/2023 या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

प्रत ____________________________________ यांना माहितीकरीता व योग्य त्या कार्यवाहीकरिता कृपया अग्रेषित.

सही/-08.08.2023
सह प्रमुख कर्मचारी अधिकारी(आस्थापना)